# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. १३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०५ /०१/२०१७

**१) संगनमत करुन विवाहीतेचा शारीरीक व मानसीक छळ केल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक ०३/०८/२०१५ ते २२/०५/२०१६ पर्यत यातील फिर्यादीचा आरोपी क्र. १ हा पती असुन आरोपी क्र. २,३,४ हे सासरे, सासु, ननंद असुन दि. ३०/०६/२००९ ला फिर्यादी सोबत आरोपी क्र. १ यांचे लग्न झाले असुन लग्नापुर्वी आरोपी क्र. १ व २ यांनी मिळुन फिर्यादीचे वडीलास ५ लाख रु. मागीतले होते. ते नाही दिले तर साक्षगंध मोडुन लग्न करणार नाही व तुम्हच्या मुलीची बदनामी करुन असे बोलल्याने फिर्यादीचे वडीलांने आरोपीतांना २ लाख रु. दिले होते. परंतु लग्न झाल्यानंतर दि. ३/०८/२०१५ ते २२/०५/०१६ पर्यत यातील आरोपी क्र. १ ते ४ यांनी संगनमत करुन फिर्यादीस उरलेले ३ लाख आपल्या वडीलांना मागुन असे बोलुन फिर्यादीस शारीरीक व मानसीक त्रास देवुन शिविगाळ करुन मारपीट केले व हुंडयासाठी फिर्यादीचा व मुलीचा छळ केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ४९८(अ),५०४,५०६,३४ भादवी सहकलम ३,४ हुंडा प्रतिबंधक कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कोसरे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**२) विवाहीतेस शारीरीक व मानसीक छळ करुन भांडण व शिविगाळ केल्याने गुन्हा नोंद :—**

सन २००७ ते आज पर्यत. यातील फिर्यादी व आरोपी हे पती पत्नी असुन त्यांचे सन २००४ मध्ये लग्न झाले आहे. यातील आरोपी हे नेहमी दारु पिण्याच्या सवयीचे असुन कोणताही कामधंदा करीत नाही. व नेहमी फिर्यादी व तिचे मुला सोबत भांडण व शिविगाळ करुन मारपीट करीत असतो तसेच तिच्या चारित्र्यावर संशय घेवुन शारीरीक व मानसीक त्रास दिल्याने युवा महीला व मुला करीता समुपदेशन केन्द्र भंडारा यांचे पत्र क्र. ३२८०/१७ दि. ३/०१/२०१७ अन्वये फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ४९८(अ),५०४,५०६ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. टेंभुर्णे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**३) अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक ०४/०१/२०१७ चे ११.०० ते १२.०० वा. दर. यातील आरोपी क्र. ०१ याचे सोबत फिर्यादी अल्पवयीन पिडीतीचे सुमारे एक महीण्यापासुन प्रेम संबध असुन आरोपी क्र. ०२ यांचे कडुन पिडीतीने सुमारे ०३ महीण्यापुर्वी २००/—रू सराव पेपर करीता उधार घेतले होते त्यावरून दि. ०४/०१/२०१७ चे ११.०० वा. सुमारास आरोपी क्र. ०१ याने प्रेम संबधातुन अल्पवयीन पिडीतेचे घराचे मागील दारातुन प्रवेश करून तिचे इच्छे विरूध्द जबरीने लैंगिक अत्याचार केला व पडुन गेला त्यानंतर १२.०० वा. सुमारास यातील आरोपी क्र. ०२ हा पिडीतेने उधार घेतलेले २००/—रू मागण्या करीता आला तेव्हा पिडीतेने पैसे नंतर देतो असे म्हटल्यावरून हात बुक्कीने मारहान करून तिचेवर जबरीने लैगीक अत्याचार केला घराचे मागील दारातुन पडुन गेला असे पिडीत अल्पवयीन फिर्यादी मुलीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३७६,४५०,३२३ भादवी. सहकलम ४,६ बालकाचे लैगीक अत्याचारापासुन संरक्षण कायदा २०१२ अन्वये दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी खंडाते पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**४) टाटा व्हीस्टा चारचाकी वाहनाचा ट्रकला धडक देवुन दोन जखमी. :—**

दिनांक ०४/०१/२०१७ चे १६.०० वा. दर. यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील कार क्र. टाटा इंन्डीका व्हीस्टा कार क्र. एमएच ४९ एफ ०५४८ चा चालकाने भरधाव वेगाने लापरवाहीने व निष्काळजीपने चालवुन बैलगाडीस ओव्हरटेक करण्याचा प्रयत्नात असतांना ट्रक क्र. सीजी ०७ सी. ९४४७ समोरून धडक दिली स्वत: व त्याचे सोबत बसलेल्या एका इसमास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम २७९,३३७, भादवी. सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. तलमले पोलीस स्टेशन दिघोरी हे करीत आहेत.

**५) क्षुल्लक कारनावरून, भांडन करून स्टीलचे बकेटीने डोक्यावर मारून महीलेला जखमी केल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक ०४/०१/२०१७ चे ०७.०० वा. दर. यातील फिर्यादी श्रीमती सुमन नरहरी नंदागवळी वय ६६ वर्ष रा. दिघोरी मोठी. ह.मु. खरासी हिची आरोपी ही नात्याने सुन सागत असुन आरोपीने फिर्यादी तु मला पलासे (टोंमने) मारतेस असे बोलुन भांडण करून स्टीलचे बकेटनी फिर्यादीचे डोक्यावर मारून आपखुसीने दुखापत केल्याने फिर्यादीचे लेखी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम ३२४, भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. शेंडे पोलीस स्टेशन पालांदुर हे करीत आहेत.

**६) अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी . :—**

दिनांक ०४/०१/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. तुमसर, सिहोरा ,साकोली व लाखनी येथील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०४ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १० लिटर हा.भ. दारू व ६०० किलो मोह फुला कि २४६००/—रू व ३०० मीलीलीटर देशी दारू १००/—रू तसेच जुगारातुन ९९०/—रू चा माल असा एकुन २५,६९०/—रू जप्त करण्यात आला आहे.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.